जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३५५ दिनांक - १३/०५/२०२३**

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर**

# ऑनलाईन मनी ट्रान्सफर करणारे दुकांनदारांना गंडा घालणा-या भामटयास अटक

दिनांक ०६/०५/२०२३ रोजी फिर्यादी यांचे मोबाईल शॉपीवर मोबाईल नंबर ८६६९३२२६२० यावरील इसमाने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना त्याचे सासरे आजारी असुन त्यांना हॉस्पीटलचे बील भरण्यासाठी ३०,०००/- रुपये पाठवायचे आहेत असे सांगुन त्याचेकडुन ३०,०००/- रुपये पाठवुन व त्याचे मोबाईलचे २४०/- रुपयांचे रिचार्ज करवुन घेवुन त्यांना त्यांचे एकुण ३०,५४०,/- रुपये न देता फसवणुक केली आहे. तसेच त्याच मोबाईल नंबर धारकाने दिनांक १०/५/२०२३ रोजी दत्तनगर भागातील जे.आर.एस मोबाईल शॉपीमधील मालक यांचेकडुन देखील ऑनलाईन ३०,०००/- रुपये पाठवुन घेवुन त्यांना ३०,०००/- रुपये न देता त्यांची देखील फसवणुक केली आहे म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी मोबाईल नंबर धारक ८६६९३२२६२० याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार हे तांत्रिक विश्लेषणाचे आधारावरुन शोध घेत असताना पोलीस अंमलदार **चेतन गोरे, निलेश ढमढेरे** यांना आरोपी सच्चाईमाता येथे असल्याची माहीती मिळाल्याने लागलीच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी संपुर्ण कात्रज, आंबेगाव, सच्चाईमाता परीसराची संपुर्ण पाहणी केली असता सदर मोबाईल नंबर धारकाचा शोध घेतला असता नमुद मोबाईल नंबर धारक **अभिषेक विजय तांबे, वय २३ वर्षे, रा. मुळ रा. १३ ताडीवाला रोड, ५ बिल्डींग, शुरवीर मित्र मंडळाचे मागे, पुणे सध्या रा. जैन मंदीर, अटल ११, साई काळेदुकान ३ रा मजला, सच्चाईमाता कात्रज, पुणे** हा जैन मंदीराचे आडबाजुस मिळुन आल्याने त्याचेकडे तपास करता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

आरोपीकडे आणखीन तपास केला असता त्याने आणखीन मनी ट्रान्सफर करणारे व्यवसायीकांची फसवणुक केली असल्याचे सांगत आहे. तरी आरोपीकडुन आणख्ीन दुकानदारांना फसविले असल्याचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार चेतन गोरे, निलेश ढमढेरे, अभिनय चौधरी, अवधुत जमदाडे, सचिन सरपाले, हर्षल शिंदे, सचिन गाडे, मंगेश पवार, धनाजी धोत्रे, अभिजीत जाधव, शैलेश साठे, निलेश खैरमोडे, मितेश चोरमोले, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.